REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# संत श्री उपासनी महाराजांचे स्त्री सक्षमीकरणातील योगदान

प्रा.हरिदास शंकर जाधव
इतिहास विभाग प्रमुख , चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,
शिरुर जि.पुणे


## प्रस्तावना :

मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतांनी अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. या संतपरंपरेतील एक महत्वाचे संत म्हणून श्री.उपासनी महाराजांचा उल्लेख करावा लागेल. अहमदनगर जिल्हयातील साकोरी हे छोटेसे खेडे उपासनी महाराजांच्या वास्तव्य व कार्यामुळे प्रसिध्दीस आले आहे. महात्मा जोतीराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे या समाज सुधारकांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात स्त्री उध्दाराचे कार्य सुरु केले, त्याच कार्याची ज्योत उपासनी महाराज व त्यांच्या शिष्या गोदावरी माताजी यांनी आपल्या आश्रमात तेवत ठेवली.

## उपासनी महाराजांचे पूर्व चरित्र

उपासनी महाराजांची कर्मभूमी अहमदनगर जिल्हा असली तरी त्यांचा जन्म नाशिक जिल्हयातील सटाणा येथे १५ मे १८७० रोजी झाला. वडील गोविंदशास्त्री व माता रुक्मिणी यांची धार्मिक वृत्ती व घरातील धार्मिक वातावरण यामुळे उपासनी महारांजावर बालपणापासून अध्यात्मिक संस्कार झाले. तत्कालीन प्रथेनुसार वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. विवाहानंतर पुढील तीन वर्षे त्यांनी सांगली येथील प्रसिध्द वैद्य व्यंकटारामणाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. त्यांनतरच्या काळात खानदेशातील जळगांव व विदर्भातील अमरावती येथे दवाखाना सुरु करुन जनसेवेला प्रारंभ केला. वैद्यकीय व्यवसायात चांगला जम बसताच त्यांनी जमिनी खरेदी—विक्रीच्या व्यवसायात प्रवेश केला. मात्र, या व्यवसायातील मोठया फसवणुकीमुळे त्यांच्यावर कफल्लक होण्याची वेळ आली. अशा प्रकारे संसारी जीवनात आलेल्या दाहक अनुभवामुळे त्यांच्यांत विरक्त प्रवृत्ती बळावत गेली अशा अवस्थेतच ते शिर्डीला आले व साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर साईच्याच आज्ञेवरुन शिर्डीतील खंडोबाच्या देवळात राहू लागले. साईबाबांच्या कृपेने त्यांना सिध्दावस्था प्राप्त झाली. सिध्दावस्था प्राप्तीनंतर त्यांनी आपला मुक्काम साकोरीतील स्मशानात हलविला. उपासनी महाराजांच्या वास्तव्यामुळे व अध्यात्मिक प्रभावामुळे साकोरीच्या स्मशानाला वैकुंठ व कैलासाचे स्वरुप प्राप्त झाले.

## अध्यात्मिक कार्य :



साकोरीच्या आश्रमातील वास्तव्य काळात लोकांना बाबांच्या दैवी सामर्थ्याची प्रचिती आल्याने सर्व जातीधर्माचे लोक बाबांच्या दर्शनास येऊ लागले त्यामुळे साकोरीस तीर्थक्षेत्राचे स्वरुप प्राप्त झाले. साकोरीतील भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन त्याठिकाणी त्यांच्या सोयीसाठी इमारती, धर्मशाळा, प्रार्थना मंदीरे उभारण्यात आली. शून्यातून एक महान सांस्कृतिक केंद्र व धर्मपीठ निर्माण झाले. याच ठिकाणाहून बाबांच्या लोकजागृतीच्या कार्याला प्रारंभ झाला. साकोरीच्या आश्रमातून बाबांनी आपल्या प्रवचनाच्या माध्यमातून गहन अध्यात्मिक

सिध्दांत सर्वसामान्य माणसाला सहज समजतील अशा दैनंदिन व्यवहारातील साध्या—सोप्या दृष्टांतांच्या आधारे मांडण्यास सुरुवात केली. प्रवचनाच्या माध्यमातून अध्यात्माचे लोण सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्याबरोबरच बाबांनी शिक्षण, कुटुंब नियोजन इ. सामाजिक प्रश्नांची उकल करताना मूलगामी विचारांचा प्रसार केला.

## स्त्री उध्दारविषयक विचार व कार्य :

उपासनी बाबांनी आपल्या आश्रमात अध्यात्मिक कार्याबरोबरच विविध सामाजिक उपक्रमही राबविले. समाजाचा अर्धा हिस्सा असलेल्या स्त्रीयांना वेदाधिकार देऊन त्यांच्याकडून यज्ञकर्म करुन घेणे हा या सामाजिक उपक्रमातील एक अत्यंत महत्वाचा व सामाजिक परिवर्तनातील क्रांतीकारी उपक्रम म्हणावा लागेल. इ.स.१९३२ साली त्यांनी आपल्या या अभिनव उपक्रमाचा श्रीगणेशा केला. कार्तिक शुध्द एकादशीस त्यांनी ब्राह्म पध्दतीने आवश्यक तेवढे धार्मिक विधी करुन पाच सुकन्यांचे पाणिग्रहण केले. या विधीनंतर स्त्रीयांच्या वेदअध्ययनास प्रारंभ झाला. तत्कालीन परिस्थितीत अत्यंत कठीण व सनातन्यांच्या रोषाला आमंत्रण देणारा अशा प्रकारचा उपक्रम उपासनी महाराजांनी शक्य करुन दाखविला. प्रारंभीच्या काळात पौराणिक पध्दतीने आश्रमातील कन्यांना चंडीयागाचे विधी—मंत्र शिकविण्यात आले. १९३८ साली भाद्रपदात गणेश यागाने प्रारंभ करुन वर्षाभरात कन्यांकडून सात यज्ञ करण्याची पध्दती सुरु करण्यात आली. चैत्र महिन्यात रामयाग, वैशाख अमावस्येस विष्णुयाग, गुरुपौर्णिमेस गुरुयाग,भाद्रपदात गणेशयाग, नवरात्रात चंडीयाग, पौषात सूर्ययाग आणि माघ महिन्यात रुद्रयाग असे सात यज्ञ स्त्रीयांच्याच्या माध्यमातून होऊ लागले. १९३९ मध्ये ज्योतिर्मठ पिठाचे पारंपारिक आचार्य श्री.शंकराचार्यानी साकोरीस भेट दिली. त्यावेळी श्री. उपासनी महाराजांनी कन्यांना वेदाधिकार देण्याच्या आपल्या कृतीमागील उद्दिष्ट शंकराचार्यांना सांगितले. मात्र, सुरुवातीला याविषयी कसलीही प्रतिक्रिया न देता शंकराचार्यांनी प्रत्यक्ष साकोरीत दोन दिवसांचा मुक्काम करुन हे कन्यांकडून होणारे यज्ञविधी पाहिले. स्त्रीयांच्या मुखातून वेदघोष ऐकून त्यांना समाधान वाटले. यज्ञकर्त्या कन्यांना त्यांनी .ऋग्वेद संहिता भेट बक्षिस म्हणून दिली. यावेळी आपल्या आशीर्वादपर वचनात शंकराचार्य म्हणाले की, ''स्त्रीयांना धार्मिक शिक्षण दिलेच पाहिजे. वैदिक धर्म आजवर जर कोणी टिकवून ठेवला असेल तर तो स्त्रीयांनीच ! लोकांची निंदा,.त्रास सहन करुन धीमेपणाने व नि:स्पृहपणे सनातन वैदिक धर्मास अनुसरुन महाराजांनी आपले हे कार्य चालविलेले पाहून मला संतोष वाटतो. अशा प्रकारे कार्य करणारे हे अखिल हिंदुस्थानातील एकमेव स्थान आहे.''

श्री. उपासनी महाराजांचे हे कार्य खरोखरच अलौकिक स्वरुपाचे होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री—उध्दाराचे कार्य महाराष्ट्रात सुरु झाले. महाराजांनी आपल्या आश्रमात विधवा, परितक्त्या स्त्रीयांना आधार दिला व स्वावलंबनाचे धडेही दिले. त्यांच्या या कार्यामुळे आत्मविश्वास गमावलेल्या निराधार स्त्रीयांना स्वयंपूर्णता लाभली. स्त्रीयांना वेदाध्ययनाचा अधिकार देऊन उपासनी महाराजांनी प्रचलित परंपरेला धक्का दिला. आज साकोरी येथील कन्याकुमारी आश्रमात वेदविद्यापारंगत असलेल्या कन्या सर्व प्रकारचे वैदिक विधी करताना दिसतात.

अशा या महान विभुतीचे देहावसन २५ डिसेंबर १९४१ रोजी झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे हे कार्य त्यांच्या शिष्या गोदावरी माताजी यांनी अविरतपणे चालू ठेवले आहे.

## संदर्भ व टीपा:

१. शांताराम टिपणीस,**गोणपाटातील परब्रह्म**, श्री. उपासनी कन्याकुमारी स्थान साकुरी, पृ.४
२. शांताराम टिपणीस, **परमपूज्य श्री. गोदावरी माताजी गौरव गाथा**, पृ.१
३. रंगराव वकील, **उपासनी वाक्यसंपदा,** श्री. उपासनी कन्याकुमारी स्थान साकुरी,
४. विजया दीक्षित, **प्रकाश पुष्प**, श्री. उपासनी कन्याकुमारी स्थान साकुरी, पृ. १८०
५. तत्रैव